RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ९२

दि.३१ जुलै २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## अहमदपूर येथे ३१ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर; सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यभरात २२ जुलै २०२६ ते ०२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत अहमदपूर विधानसभा मतदारसंघासाठी शुक्रवारी, ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहमदपूर येथील सावता माळी मंगल कार्यालय येथे समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड हे राहतील.

यावेळी जिल्हा परिषदचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाजकल्याण सभापती उत्तम माने, जिल्हा परिषद सदस्य ॲड. अजिंक्य देशमुख, इंजि. प्रफ ुलचंद्र गुंडरे, शितल खोमणे, अश्विन नागराळे, रंजना चाटे, प्रतीक्षा गुट्टे, भानुदास पोटे, अमर पाटील, उषा सोनकांबळे तसेच अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, चाकूर पंचायत समितीच्या सभापती जयश्री नागरगोजे, अहमदपूरचे नगराध्यक्ष स्वप्नील व्हत्ते आणि चाकूरचे नगराध्यक्ष भागवत फुले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील. या शिबिराच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचे लाभ, दाखले आणि महसूल विभागाशी संबंधित सेवा नागरिकांना पुरवल्या जाणार आहेत. तरी अहमदपूर व चाकुर तालुक्यातील नागरिकांनी, शेतकऱ्यांनी या समाधान शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी डॉ. मंजुषा लटपटे, अहमदपूरच्या तहसीलदार उज्ज्वला पांगरकर आणि चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव यांनी केले आहे.

## लातूर येथे मेरा रेशम, मेरा अभिमान - २ अंतर्गत पहिली रेशीम भागधारकांची सल्लामसलत बैठक उत्साहात

**लातूर/ प्रतिनिधी:** जिल्हा रेशीम कार्यालय येथे केंद्रीय रेशीम बोर्ड अंतर्गत मेरा रेशम, मेरा अभिमान - २ या उपक्रमाची पहिली रेशीम भागधारकांची सल्लामसलत बैठक मंगळवारी झाली. या बैठकीसाठी केंद्रीय रेशीम बोर्डाचे शास्त्रज्ञ डॉ. बाबुलाल सायनी यांनी तुती लागवड व कीटक संगोपन करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. तसेच त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सखोल तांत्रिक मार्गदर्शन करून शंकांचे निरसन केले.

यावेळी जिल्हा रेशीम विकास अधिकारी गोविंद कदम यांनी सांगितले की, शेतीला जोडधंदा म्हणून सिल्क व मिल्क (रेशीम आणि दुग्ध व्यवसाय) केल्यास प्रति एकरी उत्पादनात मोठी वाढ होते. या संकल्पनेचे वैशिष्ट्य म्हणजे दुग्ध व्यवसायासाठी वेगळे चारा पीक घेण्याची गरज भासत नाही. रेशीम कीटकांनी खाऊन उरलेला तुतीचा पाला हा प्रथिनांचा भरपूर मोठा स्त्रोत आहे. हा पाला जनावरांना खाऊ घातल्यास दुधाचे प्रमाण वाढते, दुधाचे फॅट चांगले बसते आणि जनावरांची तब्येतही उत्तम राहते, असे त्यांनी सांगितले. या बैठकीस जिल्हा रेशीम कार्यालयातील तांत्रिक अधिकारी श्री. सुरनर, तांत्रिक सहाय्यक श्री. पवार, श्री. देशमुख, श्री. कदम, श्री. वाघमारे, श्री. डोंगरे यांच्यासह जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी व चॉकीधारक शेतकरी आकाश जाधव आणि शत्रुघ्न फड हे उपस्थित होते.

## लातूर जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीवर अशासकीय सदस्यांची नेमणुकीसाठी ५ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/ प्रतिनिधी:** जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीच्या व्यवस्थापकीय समितीवर अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून ५ ऑगस्ट २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक अर्जदारांसाठी अर्जाचा नमुना संबंधित तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध असून या क्षेत्रात काम केल्याचा अनुभव असणाऱ्या प्रमाणपत्रासह विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

या व्यवस्थापकीय समितीवर शासनामार्फत विविध अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील गोशाळा किंवा पांजरपोळ संस्थांपैकी एका संस्थेचे अध्यक्ष, प्राणी कल्याणविषयक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांचे दोन सदस्य, सर्वसाधारण समितीने नामनिर्देशन केलेल्या दोन व्यक्ती, तसेच जिल्ह्यात मानवहितकारक व प्राणी कल्याणासाठी कार्यरत असणारे पाच ते सहा कार्यकर्ते यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे प्राणी कल्याणासाठी कार्यरत असणाऱ्या पात्र संस्था, कार्यकर्ते आणि इच्छुकांनी ५ ऑगस्ट २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी केले आहे.

# ऑलम्पिकवीर स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे दर्जेदार आयोजन करा - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**बीड/प्रतिनिधी :** क्रीडा क्षेत्र आणि खेळाडू हे दिवंगत अजितदादा पवार यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे विषय होते. राज्यात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या याच विकासदृष्टीचा वारसा पुढे नेत बीड जिल्ह्यातील क्रीडा पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. जिल्हा क्रीडा संकुलासाठी २५ कोटींच्या विकास आराखड्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, या कामांना गती देण्यात यावी, तसेच जिल्ह्यातील व्यायामशाळांना डीपीडीसीमधून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव तातडीने सादर करावेत, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित जिल्हा क्रीडा संकुल समिती तसेच स्वर्गीय खाशाबा जाधव राज्यस्तरीय



कुस्ती स्पर्धा आयोजन समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी, खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, आमदार संदीप क्षिरसागर, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, पालक सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, दिवंगत अजितदादा पवार यांनी बीड दौऱ्यादरम्यान जिल्हा क्रीडा संकुलाला भेट देऊन खेळाडूंशी प्रत्यक्ष संवाद साधला होता. त्यांच्या मागण्या जाणून घेत जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकासासाठी २५ कोटींच्या आराखड्यास मान्यता दिली होती. त्या निर्णयाला आता मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करून दर्जेदार क्रीडा सुविधा उभाराव्यात.

त्या पुढे म्हणाल्या की, बीड जिल्ह्याला क्रीडा क्षेत्राचा समृद्ध वारसा लाभला आहे. हा वारसा अधिक बळकट करण्यासाठी शासनाकडून आवश्यक निधी आणि सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल. क्रीडा विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

### व्यायामशाळांना डीपीडीसीमधून सहाय्य देण्यासाठी प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सूचना

बैठकीत जिल्ह्यातील व्यायामशाळांना डीपीडीसीमधून आर्थिक सहाय्य देण्यासाठी प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या. प्राप्त प्रस्तावांची जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने छाननी करून आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी ऑलिम्पिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाचा मान बीड जिल्ह्याला मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, ही स्पर्धा राज्याच्या प्रतिष्ठेला साजेशी, शिस्तबद्ध आणि दर्जेदार पद्धतीने आयोजित करण्यात यावी. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना निवास, भोजन, वैद्यकीय सुविधा, वाहतूक आणि सरावासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच क्रीडारसिकांसाठीही योग्य नियोजन करण्यात यावे.

स्पर्धेच्या आयोजनात कोणत्याही प्रकारची त्रुटी राहता कामा नये. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजन तातडीने पूर्ण करावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## विना परवानगी पवनचक्की रस्ता खोदकाम प्रकरणाची अपर तहसीलदारांकडून चौकशी; काम थांबवून कारवाईची रुग्ण हक्क संघर्ष समिती कडून मागणी

**औसा/प्रतिनिधी :** औसा तालुक्यातील मौजे तळणी येथे पवनचक्कीकडे जाण्यासाठी विना परवानगी रस्ता तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारीची अपर तहसीलदार, किल्लारी यांना रुग्ण हक्क संघर्ष समितीचे अध्यक्ष ॲड विजयभाऊ पंडित फोनवर कल्पना दिली त्यांची गंभीर दखल घेतली असून संबंधित महसूल अधिकाऱ्यांना तात्काळ स्थळपाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

अपर तहसीलदार, किल्लारी (जमा-१ विभाग) यांनी १७ जुलै २०२६ रोजी काढलेल्या पत्रानुसार, मंडळ अधिकारी, किल्लारी तसेच ग्राम महसूल अधिकारी, तळणी यांना या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित विभागाला कारवाई साठी श्री. दिक्षित अशोक दिंगबर (रा. तळणी) यांनी १५ जुलै २०२६ रोजी आणि सौ. सुनीता श्रीनिवास महामुनी (रा. तळणी) यांनी १६ जुलै २०२६ रोजी सादर केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने तक्रार करण्यात आली.



तक्रारीनुसार, मौजे तळणी येथील सर्व्हे क्रमांक १०० व १३८/३/१ मधून पवनचक्कीकडे जाण्यासाठी कोणतीही शासकीय परवानगी न घेता दोन ते तीन जेसीबी आणि सुमारे दहा ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात उत्खनन व रस्ता तयार करण्याचे काम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अपर तहसीलदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना उत्खनन व माती वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली आहे का, याची तातडीने पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. परवानगी घेतलेली नसल्यास संबंधित काम तात्काळ बंद करून प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी तसेच झालेल्या कामाचा सविस्तर पंचनामा व अहवाल विनाविलंब कार्यालयात सादर करावा, असे आदेश पत्रात नमूद करण्यात आले आहेत.

या प्रकरणामुळे तळणी परिसरात चर्चेला उधाण आले असून तब्बल आकरा दिवसांनी संबंधित तलाठी यांनी केला पंचनामा चौकशीनंतर विनापरवानगी प्रत्यक्ष ८ फ ुटाचा रस्ता कोरुन २५ ते ३० फुटाचा केला आहे ३० ट्रिप ट्रॅक्टरच्या सहाय्याने मुरुम हि टाकण्यात आले व आजुबाजूच्या शेतकर्यांचे बांधही कुठलीच परवानगी घेतली नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

संपूर्ण तालुक्यात अनेक शेतरस्ते याच पद्धतीने केली नसतील का आत्ता पुढे काय कारवाई होईल याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. प्रत्यक्ष गुन्हा दाखल होतो आणि संबंधितांवर कोणती प्रशासकीय कारवाई होते, याकडे रुग्ण हक्क संघर्ष समिती महाराष्ट्र लातूर चे लक्ष असुन योग्य कारवाई नाही झाली तर आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गांवरील अवैध पार्किंगविरोधात विशेष मोहीम

**लातूर/ प्रतिनिधी:** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गांवरील अवैध पार्किंगविरोधात विशेष संयुक्त कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्गांवर अवैधरीत्या उभी राहणारी जड व हलकी वाहने ही अपघातांचे प्रमुख कारण ठरत असून, रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर आहे. या पार्श्र्वभूमीवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर, जिल्हा पोलीस, महामार्ग पोलीस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) तसेच संबंधित विभागांच्या संयुक्त विद्यमानाने ही मोहीम राबविण्यात आलेली आहे.

या मोहिमेंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र. NH-361 (उजणी -लातूर -टोल प्लाझा आष्टा- माळेगाव ), NH-63 (लातूर-मुरूड, नळेगाव-टाकळी (देगलूर रोड)), NH-548B (किल्लारी- औसा टी पॉईंट, लातूर-लखमापूर), NH752K (निलंगा-औराद) तसेच लातूर शहर परिसरातील राष्ट्रीय महामार्ग या मार्गांवर विशेष तपासणी व कारवाई करण्यात येत आहे.

या मोहिमेत मा. जिल्हाधिकारी लातूर, मा. पोलीस अधीक्षक लातूर व मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गांवरील अवैध पार्किंगविरोधात संबंधित विभागांमार्फत वाहनांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. यासोबतच संबंधित वाहनचालक व मालकांना वाहने सुरक्षित व अधिकृत पार्किंग स्थळी उभी करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी सर्व वाहनचालकांना आवाहन केले आहे की, राष्ट्रीय महामार्गांवर कोणत्याही परिस्थितीत अवैध पार्किंग करू नये. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोटार वाहन कायदा व इतर संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

# लातूर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी; हरवलेले ७६ मोबाईल शोधून मूळ मालकांच्या स्वाधीन

## शिवाजीनगर पोलिसांनी २५, एमआयडीसी २१, विवेकानंद चौक १४ तर गांधी चौक पोलिसांनी १६ मोबाईल शोधले

**लातूर/ प्रतिनिधी:** नागरिकांचे हरवलेले अथवा गहाळ झालेले मोबाईल फोन शोधून ते मूळ मालकांना परत मिळवून देण्यासाठी लातूर शहर पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. पोलिसांनी तांत्रिक तपास, उपलब्ध माहितीचे विश्र्लेषण आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करत तब्बल ७६ हरवलेले मोबाईल फोन शोधून काढले. दि. ३० जुलै २०२६ रोजी लातूर शहराचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या हस्ते हे मोबाईल संबंधित मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहर पोलिसांनी ही विशेष मोहीम राबविली. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळणे ही नागरिकांसाठी मोठी दिलासादायक बाब असल्याने पोलिसांनी या मोहिमेला विशेष प्राधान्य दिले.

लातूर शहर उपविभागातील शिवाजीनगर, एमआयडीसी, विवेकानंद चौक आणि गांधी चौक पोलीस ठाण्यांच्या हद्दीत नागरिकांचे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने पोलिसांनी तांत्रिक तपास करून मोबाईलशी संबंधित उपलब्ध माहितीचे विश्र्लेषण केले. विविध पातळ्यांवर तपास आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यानंतर पोलिसांना हरवलेल्या मोबाईलचा माग काढण्यात यश आले.

या विशेष मोहिमेत शिवाजीनगर पोलीस ठाण्याने २५, एमआयडीसी पोलीस ठाण्याने २१, विवेकानंद चौक पोलीस ठाण्याने १४ आणि गांधी चौक पोलीस ठाण्याने १६, असे एकूण ७६ मोबाईल फोन हस्तगत केले. दि. ३० जुलै रोजी हे सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. अनेक दिवसांपासून हरवलेला मोबाईल पुन्हा हाती मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले. पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नागरिकांनी लातूर पोलिसांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याची ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. नागरिकांनी मोबाईल हरवल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती देऊन आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या




मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे व परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी अक्षय जाधव यांच्या समन्वयातून करण्यात आली. या मोहिमेत शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील व पोलीस अंमलदार लक्ष्मण कांदे, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे व पोलीस अंमलदार अक्षय डिगोळे, विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार व पोलीस अंमलदार त्रिंबकेश्र्वर विरकर, तसेच गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड व पोलीस अंमलदार योगेश चिंचोलीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय...

### ज्येष्ठांचा सन्मान आणि अधिकार

अनेक ज्येष्ठ नागरिक उपेक्षा, मानसिक छळ आणि आर्थिक शोषणाला सामोरे जात आहेत. त्यांचा सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याचा अधिकार जपण्यासाठी कुटुंब, समाज आणि कायदा या तिन्हींची जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. भारतीय संस्कृतीत ज्येष्ठ नागरिकांना कुटुंबाचा आधारस्तंभ, अनुभवाचे भांडार आणि संस्कारांचे विद्यापीठ मानले जाते. त्यांनी आयुष्यभर कुटुंब, समाज आणि देशासाठी दिलेले योगदान अमूल्य आहे; परंतु बदलती जीवनशैली, विभक्त कुटुंब पद्धती, वाढते नागरीकरण, आर्थिक ताण आणि पिढ्यांमधील वाढते अंतर यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक उपेक्षा, मानसिक छळ, आर्थिक शोषण आणि असुरक्षिततेचा सामना करत आहेत. ज्येष्ठांचा छळ हा केवळ कौटुंबिक प्रश्न नाही. तो सामाजिक, आरोग्यविषयक आणि मानवी हक्कांचा गंभीर विषय आहे. अनेक वृद्ध पालक कौटुंबिक प्रतिष्ठा, मुलांवरील प्रेम किंवा कायद्याची माहिती नसल्यामुळे अन्याय मुकाट्याने सहन करतात. अत्याचार म्हणजे केवळ मारहाण नव्हे. मानसिक व भावनिक छळ हा सर्वाधिक आढळणारा प्रकार आहे. सतत अपमान, टोमणे मारणे, बोलणे बंद करणे, घरात एकटे पाडणे, निर्णयांपासून दूर ठेवणे किंवा वृद्धाश्रमात पाठवण्याची धमकी देणे यामुळे वृद्ध व्यक्ती नैराश्य, चिंता आणि आत्मविश्र्वास गमावू शकतात. आर्थिक शोषण हेही वाढते संकट आहे. पेन्शन किंवा बँक खात्यातील पैसे परवानगीशिवाय वापरणे, एटीएम कार्ड किंवा ओटीपीचा गैरवापर करणे, मालमत्ता आपल्या नावावर करून घेण्यासाठी दबाव टाकणे किंवा फसवणूक करणे अशा घटना वाढत आहेत. अनेक ज्येष्ठ प्रेमापोटी आयुष्यभराची कमाई मुलांच्या नावावर करतात आणि नंतर स्वतःच असुरक्षित होतात. वैद्यकीय व शारीरिक उपेक्षा हीदेखील अत्याचाराचीच एक बाजू आहे. वेळेवर अन्न, औषधे, वैद्यकीय उपचार, श्रवणयंत्र किंवा इतर आवश्यक सुविधा न देणे, स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांचे आरोग्य झपाट्याने खालावते. याशिवाय शारीरिक छळ, धक्काबुक्की, मारहाण किंवा अमानुष वागणूक देणे हे गंभीर आणि दंडनीय गुन्हे आहेत. भारतातील 'माता-पिता व ज्येष्ठ नागरिक देखभाल व कल्याण अधिनियम, २००७' हा ज्येष्ठ नागरिकांच्या संरक्षणासाठी महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यानुसार मुलांनी किंवा कायदेशीर वारसांनी आपल्या वृद्ध पालकांच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि औषधोपचाराची जबाबदारी घेणे बंधनकारक आहे. ज्येष्ठ नागरिकांना जलद न्याय मिळावा यासाठी मेंटेनन्स ट्रिब्युनल मार्फत सुनावणीची व्यवस्था आहे. या कायद्यातील कलम २३ विशेष महत्त्वाचे आहे. एखाद्या ज्येष्ठ नागरिकाने देखभालीच्या अटीवर मालमत्ता मुलांच्या किंवा नातेवाईकांच्या नावावर केली आणि त्यांनी नंतर काळजी घेण्यास नकार दिला, तर असे हस्तांतरण न्यायाधिकरण रद्द करू शकते. कलम २४ नुसार ज्येष्ठ नागरिकांना असहाय अवस्थेत सोडणे किंवा त्यांची उपेक्षा करणे हा दंडनीय गुन्हा आहे. याशिवाय जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरणामार्फत मोफत कायदेशीर सल्ला मिळू शकतो. अनेक पोलीस ठाण्यांमध्ये ज्येष्ठ नागरिक कक्ष कार्यरत असून त्यांच्या तक्रारींना प्राधान्य दिले जाते. राष्ट्रीय एल्डर लाईन १४५६७ या टोल-फ्री हेल्पलाईनवर कायदेशीर मार्गदर्शन, मानसिक समुपदेशन, शासकीय योजनांची माहिती आणि आवश्यक मदत उपलब्ध करून दिली जाते. सर्व मालमत्ता आयुष्याच्या सुरुवातीलाच इतरांच्या नावावर करू नये. मृत्युपत्र कायदेशीर सल्ल्याने तयार करावी. बँक व्यवहार, ओटीपी किंवा पासवर्ड कोणालाही सांगू नयेत. नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी. ज्येष्ठ नागरिक संघटना, वाचन मंडळे, योग किंवा व्यायाम गटांमध्ये सहभागी व्हावे. ज्येष्ठांना पैशांपेक्षा प्रेम, संवाद आणि सन्मान अधिक महत्त्वाचा वाटतो. दररोज काही वेळ त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांचा आदर करणे, घरातील निर्णयांमध्ये त्यांना सहभागी करून घेणे आणि नातवंडांशी त्यांचा संवाद वाढवणे या साध्या गोष्टी त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. एखादा वृद्ध अचानक भीतीयुक्त वागत असेल, वजन कमी झाले असेल, वारंवार जखमा होत असतील किंवा आर्थिक व्यवहारांमध्ये संशयास्पद बदल दिसत असतील, तर त्यामागे अत्याचार असण्याची शक्यता विचारात घेऊन योग्य ती मदत करावी. ज्येष्ठांचा सन्मान हीच खरी भारतीय संस्कृती आणि त्यांचे संरक्षण हीच आपली सामूहिक जबाबदारी आहे.

# डिजिटल नकाशांतून जलसमृद्धीकडे!!

## ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशांनी घडवले महाराष्ट्रातील जलनियोजनाचे नवे पर्व




प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System - GIS) विकसित करून राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे यंत्रणेच्या वेबसाईटवर प्रथमच सर्वसामान्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन, भूजल पुनर्भरण, जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्तरावरील विकास नियोजनाला नवी गती मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांच्या संगमातून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे; परंतु त्या प्रत्येक थेंबाचे शास्त्रशुद्ध नियोजन हीच खरी जलसुरक्षेची गुरुकिल्ली आहे.

एखाद्या गावात नवी विहीर कोठे घ्यावी? पाणी कोणत्या दिशेने वाहते? डोंगराच्या उतारावर सलग समतल चर (Continuous Contour Trenches - CCT) नेमके कुठे घ्यावेत? शेततळे, सिमेंट नाला बांध (CNB), गॅबियन किंवा इतर जलसंधारणाची कामे कोणत्या ठिकाणी सर्वाधिक परिणामकारक ठरतील? एखाद्या भागात भूजल पुनर्भरणाची क्षमता किती आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पूर्वी अनेक दिवस क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे, स्थानिक अनुभव आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत असे.

आज मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. संगणकाच्या पडद्यावर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर एका क्लिकमध्ये संपूर्ण पाणलोट डोळ्यासमोर उभा राहतो. नदी-नाले,



ओघोळ, जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, गावांच्या सीमा, गट क्रमांक, भूजल पुनर्भरणाची क्षमता आणि जलसंधारणाच्या उपचारांची योग्य ठिकाणे यांची माहिती आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली आहे. या परिवर्तनामागे आहे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC:PMKSY 2.0) अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उभारलेली आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (GIS). या उपक्रमाचे सर्वात मोठे यश केवळ GIS तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर महाराष्ट्रातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट (Micro Watershed) नकाशे प्रथमच सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देणे, ही या उपक्रमाची ऐतिहासिक कामगिरी आहे. शासनाच्या तांत्रिक दालनात मर्यादित असलेली माहिती आज प्रत्येक शेतकरी, ग्रामपंचायत, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकापर्यंत पोहोचली आहे. ही केवळ डिजिटल सेवा नाही; तर जलसंधारणाच्या ज्ञानाचे लोकशाहीकरण आहे.

**जलसंधारणासमोरील वाढती आव्हाने**

महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश आहे. कोकणातील मुसळधार पाऊस, विदर्भातील उष्ण हवामान, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा..प्रत्येक भागाची जलस्थिती वेगळी आहे. परंतु या सर्व भागांना एकच समान आव्हान आहे, ते म्हणजे पावसाचे पाणी अधिकाधिक प्रमाणात जमिनीत मुरविणे आणि भविष्यासाठी साठवणे.

हवामान बदलामुळे पावसाचा कालावधी कमी होत आहे, तर अल्पावधीत अतिवृष्टीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्याचबरोबर मृदा धूप वाढते, भूजल पातळी घटते आणि शेतीची उत्पादकता कमी होते. अशा परिस्थितीत प्रत्येक थेंबाचे नियोजन शास्त्रीय पद्धतीने करणे ही काळाची गरज बनली आहे.

यासाठी केवळ जलसंधारणाची कामे करणे पुरेसे नसते; तर योग्य ठिकाणी, योग्य प्रकारचा आणि योग्य प्रमाणात उपचार करणे आवश्यक असते. हे काम अंदाजावर नव्हे, तर अचूक माहितीच्या आधारेच शक्य होते.

**अंदाजावरून विज्ञानाकडे**
**जलनियोजनातील डिजिटल झेप**

काही वर्षांपूर्वी पाणलोट विकासाचे नियोजन करताना प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी, स्थानिक अनुभव आणि कागदी नकाशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असे. प्रत्येक विभागाकडे वेगवेगळी माहिती असल्याने सर्व माहिती एकत्र करून सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report - DPR) तयार करण्यासाठी मोठा कालावधी लागत असे. काही ठिकाणी एकाच प्रकारची कामे पुन्हा प्रस्तावित होत, तर काही भाग आवश्यक उपचारांपासून वंचित राहत असे.

आज GIS प्रणालीमुळे हे चित्र बदलले आहे. उपग्रह प्रतिमा, डिजिटल एलिव्हेशन मॉडेल, GPS आधारित सर्वेक्षण, मृदेची माहिती, पर्जन्यमान, भू-आकृती, जलप्रवाह, भूजल आणि इतर विविध माहितीचे स्तर (Layers) एकत्र करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण केले जाते. परिणामी निर्णय प्रक्रियेला डेटा आणि विज्ञानाचा भक्कम आधार मिळाला आहे. याच कारणामुळे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० मध्ये GIS bm Digital Brain असे संबोधले जाते. कारण ही प्रणाली केवळ नकाशे तयार करत नाही; तर संपूर्ण पाणलोट विकासासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करते.

**महाराष्ट्राची डिजिटल जलसंपत्ती :**
**५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे**

या संपूर्ण उपक्रमातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे (Micro Watershed Maps) तयार करून ते विनामूल्य सार्वजनिक वापरासाठी यंत्रणेच्या VSINA या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. ही केवळ आकड्यांची नोंद नाही; तर राज्याच्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाचा डिजिटल पाया आहे.

आज कोणताही नागरिक आपल्या गावाचा सूक्ष्म पाणलोट नकाशा https://mhvslna.org/ या संकेतस्थळावर पाहू शकतो, डाउनलोड करू शकतो आणि त्याची प्रिंटही घेऊ शकतो. पूर्वी केवळ तज्ज्ञ आणि शासकीय यंत्रणांपुरती मर्यादित असलेली माहिती आता लोकांच्या हातात आली आहे. यामुळे शासनाची माहिती अधिक पारदर्शक झाली आहे, तसेच नागरिकांच्या सहभागालाही नवी दिशा मिळाली आहे. पाणलोट विकास हा केवळ सरकारी कार्यक्रम न राहता, लोकसहभागातून उभा राहणारा विकासाचा पाया बनू लागला आहे.

# जेन-झी जनरेशन गटार आहे म्हणतांना कंगनाला थोडीशी तरी वाटायला पाहिजे!

जेन-झी पिढीला गटार पिढी आहे,म्हणणाऱ्या कंगनाने स्वतःचा चेहरा आरश्यात पहावा नंतर समजेल कोण गटार आहे आणि कोण शुद्ध आहे. कंगना रानावत लोकप्रतिनिधी आहेत आणि त्या देशाचे नेतृत्व करीत आहे अशा परिस्थितीत आपण काय बोलतो याचे भान त्यांनी ठेवले पाहिजे.सर्वसामान्य जनता बोलतांना आपल्या जिभेवर थोडासा तरी ताबा ठेवतो.परंतु कंगनाला स्वतःच्या बोलण्यावर भान नसल्याचे दिसून येते. कंगना रानावत म्हणते की, पाश्र्चात्य प्रभावाखालील भारतीय महिलांची नवी पिढी जनरेशन गटर आहे.कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे की,भारतात पाश्र्चात्य पध्दतीचा प्रभाव चित्रपट सृष्टीपासून वाढला आहे आणि त्यात आपणही सहभागी होता आणि आहात.सध्याच्या चित्रपटांमध्ये पाश्र्चात्य पध्दती प्रभावशाली होत आहे हे तुम्हाला दिसत नाही का? त्यामुळे हिंदू संस्कृतीचे वाटोळे होत आहे हे लक्षात येत नाही का?अशा परिस्थितीत तुम्ही पाश्र्चात्य पध्दतीचा संसदेत विरोध का करीत नाही?परंतु अभद्र वक्तव्य करून कंगनाने लोकप्रतिनिधी या पदाला कलंकित केले आहेत. जेन-झीचे आंदोलन तब्बल ३५ दिवस चालले आणि सरकारच्या माध्यमातून ३६ व्या दिवशी तोडगा निघाला.या आंदोलना दरम्यान सोनम वांगचूक यांनी उपोषण सुध्दा केले व अनेक सामाजिक संघटनांनी आणि विरोधी पक्षांनी पुर्णपणे समर्थन दिले.यावर तोडगा काढण्यासाठी सरकार मार्फत तीन फेऱ्यांच्या चर्चा झाल्या आणि सरकार सुध्दा कॉकरोच जनता पार्टी समोर झुकले. पक्ष-विपक्ष व सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा तोडगा निघावा यासाठी प्रयत्नशील होते.हे सर्व झाल्यानंतर आणि तोडगा निघाल्यानंतर युवा पिढी बद्दल घाणेरड्या दर्जाचे वक्तव्य करने एका लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही असे मला वाटते.कंगनाने याचा विचार केला का की, लाखो युवा रस्त्यावर का आले? त्यांच्या भावनांना किती मोठी ठेस पोहोचली असावी याचा विचार केला का?युवकांच्या भावनांचा थोडासाही विचार न करता आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी वाटेल ते घाणेरडे वक्तव्य एखाद्या लोकप्रतिनिधीने करने म्हणजे लोकशाहीला काळीमा फासणारे म्हणावे लागेल. जंतमंतरचे आंदोलन चित्रपट नसून लोकशाही आहे हे कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे.आज पेपर फुटीमुळे देशाच्या शिक्षण प्रणालीवर मोठा काळा धब्बा लागला आहे आणि ही घटना संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली.कारण राजकीय पुढाऱ्यांचे मुले विदेशात शिकतात ते कंगणाला दिसत नाही का?आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांना आपल्या मुलांना सरकारी शाळा-महाविद्यालयाल शिकवायला लाज वाटते. राजकीय पुढाऱ्यांचे मुले जर सरकारी शाळा-महाविद्यालयात शिकली असती तर देशात पेपर फुटीचा प्रकार दिसलाच नसता व जेन-झी रस्त्यावर आल्याचे दिसले नसते.राजकिय पुढाऱ्यांचे मुले विदेशात आणि सर्वसामान्यांची मुले देशात शिकत आहे आणि त्यातही पेपर फुटी या असहय्य वेदना युवकांना कशा काय सहन होणार?आज जेन-झी देशाचे भविष्य आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे.आज युवकांना काय वेदना होत आहे याची जाण कंगणाला नसावी.जेन-झीने जे काही केले ते आत्म्यातुन केले आणि कंगना जे घृणास्पद वक्तव्य केले ते राजकीय प्रेरीत आहे ही बाब कंगना राणावत ने लक्षात ठेवली पाहिजे आणि गटार जेन-झी आहे की स्वतः कंगना आहे हे सरकारने ठरवून कंगना राणावतच्या घृणास्पद वक्तव्यावर लगाम कसली पाहिजे. कंगना राणावत यांनी जेन-झीचा उल्लेख गटार पिढी असा करून युवकांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम केले. कंगना रानावत यांनी जेन-झीचा उल्लेख गटार पिढीअसा केला आणि त्यांच्या ध्वनि चित्रफिती पाहून आपल्याला मळमळते,ओकाऱ्या येते असे इन्स्टाग्रामवर लिहिले.जंतरमंतर येथे झालेली निदर्शने घाणं, कचरा आणि कुरूपतेचे दर्शन होते,असे रानावत यांनी म्हटले आहे.सोशल मीडियावर जेन-झीचे व्हायरल रील्स पाहून मला ओकारी आल्यासारखे वाटते.हे लोक ड्रग्स आणि दारू पिण्याच्या स्वातंत्र्याचा अभिमान बाळगत आहेत.कंगना रानावतला दारू आणि ड्रग्स सारख्या नशेली पदार्थांची एवढी घृणा वाटत आहे तर आतापर्यंत सरकारने किंवा कंगनाने दारू बंदी किंवा नशेली पदार्थांबद्दल आवाज का उठवला नाही व दारू किंवा नशेली पदार्थांच्या फॅक्टऱ्या बंद का केल्या नाहीत. आपण काय बोलतो याचे भान रानावत यांनी ठेवले पाहिजे. जेन-झीच्या आंदोलनावर सरकार एकीकडे तोडगा काढत आहे तर, दुसरीकडे कंगना रानावत सीजेपीच्या आंदोलनावर अभद्र भाषा बोलुन युवा पिढीच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे ही बाब लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही.कंगना म्हणते कॉकरोच गंघगी पसरवित आहे, कंगनाजी आपण थोड्या चुकलात कॉकरोच गंधगी पसरवित नसुन गंधगी साफ करण्याचे काम करीत आहेत आणि करून दाखवले म्हणून तुम्हाला कॉकरोच गटार वाटत आहे.चित्रपटामध्ये काहीही बोलले तर चालते,परंतु इथे कृती करून दाखवावी लागते. कॉकरोच जनता पार्टी सहजच तयार झाली नसुन तुम्ही चुका केल्या म्हणून ती तयार झाली आहे आणि तुमच्या चुकांचे निराकरण करण्यासाठी ते ठाम आहेत.कंगना म्हणते की,मैने अपनी जिंदगी मे कभी किसी एक जगह पर इतना भद्दापन नहीं देखा बरोबर आहे आपण पाहुही शकत नाही.कारण आतापर्यंत तुम्ही चित्रपटांमध्ये काम करायच्या आता तुम्हाला लोकांमध्ये करावे लागत आहे आणि लोकांनामध्ये काम करतांना कसे बोलावे याचा तुम्हाला अभ्यास नसावा. कारण तुमच्या वक्तव्यावरून भाजपाच्या नेत्यांनी सुद्धा नाराजगी व्यक्त करीत आहे.जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# केज येथे 'वर्षावास २०२६' अंतर्गत ग्रंथवाचन व धम्म प्रवचन मालिकेचे दिमाखात उद्घाटन

## शहरातील बौद्ध बांधवांनी प्रत्येक ठिकाणी वर्षावास सुरू करावा-आयू. जयपाल मस्के

**केज/प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा, केज यांच्या वतीने 'वर्षावास २०२६' अंतर्गत आयोजित ग्रंथवाचन व धम्म प्रवचन मालिकेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. हा सोहळा बुधवार, दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता वेळूवन बुद्ध विहार, भीमनगर, केज येथे मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यंतच्या तीन महिन्यांच्या कालावधीत बौद्ध धम्मात वर्षावासाचे व्रत पाळले जाते. या कालावधीत युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या अमूल्य ग्रंथाचे वाचन केले जाते. याच औचित्याने केज येथे या विशेष ग्रंथवाचन व धम्म प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले. मालिकेतील पहिला विषय 'विश्ववगुरु तथागत भगवान बुद्ध' हा होता. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना वंदन करून व त्रिशरण पंचशील ग्रहण करून करण्यात आली.

मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन

या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. अरुण पटेकर (संघटक, भारतीय बौद्ध महासभा, बीड जिल्हा पूर्व) यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी आषाढ पौर्णिमेचे तथागत गौतम बुद्धांच्या आयुष्यातील अनन्यसाधारण महत्त्व विशद केले. तसेच त्यांनी वर्षावासाचे महत्त्व, 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाची थोरवी आणि आजच्या काळात धम्म प्रवचनाची असलेली गरज यावर सविस्तर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. जयपाल मस्के (शहराध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, केज) होते. त्यांनी आषाढ पौर्णिमा व वर्षावासानिमित्त सर्वांना मनःपूर्वक सदिच्छा व्यक्त केल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी शहरातील प्रत्येक नगरात वर्षावास सुरू करावा व धम्म कार्य पुढे न्यावे असे कळकळीचे आवाहन केले, तसेच शहरातील सर्व बौद्ध बंधू-भगिनींनी या संपूर्ण धम्म प्रवचन मालिकेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे नेटके आणि अभ्यासपूर्ण संचलन मुख्याध्यापक आयु.नंदकुमार मस्के यांनी केले.

प्रमुख उपस्थिती

या सोहळ्याला परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये चंद्रकांत मस्के, महेंद्र मस्के, कल्याण मस्के, डॉ. प्रभाकर ठोके, दीपक मस्के यांचा प्रामुख्याने समावेश होता. पत्रकार तात्या गवळी यांचीही कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती.

महिला पदाधिकाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती

धम्म प्रवचन मालिकेच्या उद्घाटनाला महिला उपासिकांची उपस्थिती उल्लेखनीय होती. महिला तालुका शाखेतर्फे महानंदा गायकवाड, मीरा खरात, प्रमिला मस्के, बबिता मस्के, संगीता साळवे, कौशल्या मस्के यांनी हजेरी लावली, तर शहर शाखेतर्फे सुरेखा मस्के, कुसुम मस्के, रत्नमाला मस्के, आशा मस्के, हौसाबाई हजारे, कलावती हजारे, सुनीता हजारे, सावित्राबाई कांबळे, शीतल लोमटे, वर्षा हजारे, मैनाबाई मस्के उपस्थित होत्या.



खीरदान आणि सांगता

वर्षावास उद्घाटन सोहळ्यानिमित्त भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन सचिव कल्याण मस्के यांच्या परिवाराकडून खीरदान करण्यात आले. उपस्थित सर्व बौद्ध बांधव, उपासक-उपासिका आणि नागरिकांनी याचा लाभ घेतला. याशिवाय परिसरातील अनेक नागरिक, उपासक-उपासिका तसेच बालक व बालिकांचीही या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता सरनत्त घेऊन तसेच 'जय भीम' आणि 'नमो बुद्धाय' च्या जयघोषात करण्यात आली.

# महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासावर भर - मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील प्रत्येक नागरिकाला उत्तम आरोग्य, पोषण, सुरक्षित मातृत्व, बालकांचा सर्वांगीण विकास आणि महिलांचे सक्षमीकरण सुनिश्चित करण्यावर भर देण्यात येत असून सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून शाश्वत विकास ध्येयांची विहित कालमर्यादेत प्रभावी पूर्तता करण्याचे निर्दे श महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिला व बालविकास विभागामार्फत मंत्रालयात शाश्वत विकास ध्येयांसंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, सन २०३० पर्यंत संयुक्त राष्ट्र संघानी निश्चित केलेली शाश्वत विकास ध्येये (डीींरळपरलश्रश ऊर्शींशश्रेशिपीं ॠेरश्री-डऊॠ) प्रभावीपणे साध्य करण्यासाठी सर्व विभागांनी नियोजनबद्ध, परिणामकारक आणि समन्वयात्मक पद्धतीने काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर योजनांची फलनिष्पत्ती वाढविण्यासाठी नियमित मूल्यमापन, प्रभावी अंमलबजावणी आणि परिणामाधारित कार्यपद्धतीवर विशेष भर देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव उपस्थित होते. एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या आयुक्त श्रीमती माधवी सरदेशमुख आणि महिला व बालविकास आयुक्त श्रीमती वर्षा लड्डा या दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाल्या. बैठकीत महिला व बालविकास तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित शाश्वत विकास ध्येयांतील विविध निर्देशकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. राज्याची सद्यस्थिती, राष्ट्रीय स्तरावरील क्रमवारी, विविध योजनांच्या अंमलबजावणीतील प्रगती तसेच सन २०३० पर्यंत निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक महत्त्वाच्या निर्देशकांमध्ये महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या लाभार्थी संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, गर्भवती महिलांमधील निमियाचे प्रमाण कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. तसेच पाच वर्षांखालील बालकांमधील कुपोषण, कमी वजन आणि बुटकेपणा कमी करण्यासाठी राबविण्यात आलेल्या पोषणविषयक उपक्रमांमुळे समाधानकारक सुधारणा झाल्याचे अद्ययावत आकडेवारीवरून स्पष्ट झाले असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. संस्थात्मक प्रसूती, माता मृत्यू दर आणि पाच वर्षांखालील बालमृत्यू दर या आरोग्यविषयक निर्देशकांमध्ये राज्याने शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने समाधानकारक कामगिरी कायम राखली आहे.

याशिवाय महिलांच्या पोषणस्थितीत सुधारणा, कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत महिलांचा वाढता सहभाग आणि मोबाईल फोन वापरणाऱ्या महिलांच्या प्रमाणात झालेली वाढ ही महिला सक्षमीकरणाच्या दिशेने होत असलेल्या सकारात्मक प्रगतीची महत्त्वाची निदर्शके असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आगामी कृती आराखड्याच्या अनुषंगाने सर्व विभागांनी प्रलंबित माहिती विहित मुदतीत अद्ययावत करावी, विविध निर्देशकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यांच्या सर्वोत्तम कार्यपद्धतींचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करावा, तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली (चखड) अधिक सक्षम करून योजनांचे रिअल-टाईम निरीक्षण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश देण्यात आले. आगामी अर्थसंकल्पीय नियोजन हे शाश्वत विकास ध्येये आणि 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्याच्या विकासदृष्टीशी सुसंगत ठेवण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात (-झ-ठ) शाश्वत विकास ध्येयांशी संबंधित कामगिरीचा महत्त्वाचा कार्यप्रदर्शन निर्देशक (घझख) म्हणून समावेश करण्याबरोबरच आकांक्षित जिल्हे आणि आकांक्षित तालुक्यांच्या प्रगतीवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचेही निश्चित करण्यात आले.

## भारताला आतून पोकळ करण्यासाठी छुपे युद्ध सुरू- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** संरक्षण, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात भारत वेगाने प्रगती करत असतानाच, देशाला लढाईत पराभूत करणे शक्य नसल्याने आता शत्रू राष्ट्रांकडून भारताला आतून पोकळ करण्यासाठी एक छुपे युद्ध सुरू करण्यात आले आहे. या षड्यंत्राचा भाग म्हणून देशातील अफाट युवा शक्तीला अमली पदार्थांच्या (ऊ्रीेुी) जाळ्यात ओढून त्यांची दिशा भरकटवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ण्शब अनहीर इ्रहरन्) यांनी गुरुवारी केला.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'ड्रग्ज फ्री मुंबई अभियान २०२६' चा शुभारंभ गुरुवारी वरळी येथील एनएससीआय सरदार वल्लभभाई पटेल स्टेडीयम (डोम) येथे पार पडला. या वेळी हजारो शालेय विद्यार्थ्यांना ड्रग्जमुक्त सम ाजाची शपथ दिल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई पालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान

## विद्यार्थ्यांनी स्वतंत्र विचार आणि उद्योजकतेचा स्वीकार करावा राज्यपाल

**सोलापूर/प्रतिनिधी :** आजच्या जगात यशासाठी तांत्रिक ज्ञानासोबतच संवाद कौशल्ये, डिजिटल आणि एआय साक्षरता, चिकित्सक विचार, सर्जनशीलता, सांघिक कार्य, नेतृत्व आणि मजबूत नैतिक मूल्येदेखील तितकीच महत्त्वाची आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. विद्यार्थ्यांनी नेहमी जिज्ञासू राहावे, स्वतंत्रपणे विचार करावा, उद्योजकतेचा स्वीकार करावा आणि आयुष्यभर ज्ञान संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २२ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, माजी खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण प्रा. डॉ. ज्येष्ठराज भालचंद्र जोशी, सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे, विद्यापीठाचे प्र- कुलगुरू लक्ष्मीकांत दामा आदी उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण प्रा. डॉ. जेष्ठराज भालचंद्र जोशी यांना मानद 'डी. एस्सी.' आणि सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश यशवंत प्रभुणे यांना मानद 'डी. लिट.' पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.



सुवर्णपदक विजेत्यामध्ये विद्यार्थिनींचा सर्वाधिक समावेश असल्याबद्दल आनंद व्यक्त करतांना राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, शिक्षणातील मुलींचे यश देशातील तरुण महिलांचा वाढता आत्मविश्वास आणि आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. आजन्म शिक्षण हीच यशाची गुरुकिल्ली असून शिकणे कधीही थांबवू नका, सचोटीशी कधीही तडजोड करू नका आणि स्नातकांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग नेहमी समाजाच्या सेवेसाठी करावा, असा संदेशही राज्यपालांनी विद्यार्थ्यांना दिला.

राज्यपाल पुढे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने ए.आय., मशीन लर्निंग, जैवतंत्रज्ञान, नॅनोसायन्स, सायबर सुरक्षा, फूड टेक्नॉलॉजी आणि शिकाऊ उमेदवारीवर आधारित शिक्षणाचे कार्यक्रम सुरू केले आहेत. आजच्या वेगाने बदलणाऱ्या काळात ही तंत्रज्ञाने आणि वैज्ञानिक नवकल्पना या जगाला अभूतपूर्व वेगाने बदलत आहेत. विद्यापीठाने सुरू केलेले हे उपक्रम विद्यार्थ्यांना भविष्यातील नोकऱ्या आणि संधींसाठी निश्चितच तयार करतील, असा विश्वास व्यक्त करतानाच विद्यापीठाने एनआयआरएफ क्रमवारीमध्ये उच्च स्थान मिळविण्यासाठी प्रयत्नशील रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

तंत्रज्ञान आपले जीवन सुधारू शकते, परंतु सहानुभूती आणि करुणेविना तंत्रज्ञानाला अर्थ नाही. हे लक्षात घेत नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करत असताना नेहमी मानवता जपावी, असा संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यापीठे केवळ पदव्या देण्यापर्यंत मर्यादित न राहता ती ज्ञान, संशोधन, नवोपक्रम, उद्योजकता आणि राष्ट्र उभारणीची केंद्रे बनली पाहिजेत. त्यांनी तरुणांना बदलांशी जुळवून घेण्यासह बदलांचे नेतृत्व करण्यासाठीदेखील तयार केले पाहिजे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात शक्तिशाली साधन आहे. विद्यापीठांनी न्याय, समानता, सर्वसमावेशकता, पर्यावरणीय जबाबदारी आणि समाजसेवेला चालना दिली पाहिजे असे श्री.वर्मा म्हणाले.

भविष्य केवळ नोकरी शोधणाऱ्यांचे नाही तर रोजगार निर्माण करणाऱ्यांचेदेखील आहे. सोलापूर हे दीर्घकाळापासून व्यापार, उद्योग आणि उद्योजकतेचे केंद्र राहिले आहे. येथील प्रसिद्ध वस्त्रोद्योग प्रसिद्ध असून देशभरात ओळख मिळवली आहे. आपण नवोपक्रमाला प्रोत्साहन देऊन, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साह देऊन, मूल्यवृद्धीचे उद्योग निर्माण करून आणि आपल्या तरुणांसाठी रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करून हा वारसा पुढे नेला पाहिजे, अशी अपेक्षाही राज्यपाल श्री.वर्मा यांनी व्यक्त केली.

दीक्षांत भाषणात माजी खासदार डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, तंत्रज्ञान विलक्षण वेगाने आपल्या जीवनशैलीवर प्रभाव टाकत आहे. अशा स्थितीत अध्ययन आणि अध्यापन पद्धतीत काही बदल घडवून आणणे क्रमप्राप्त आहे. आपली अध्ययन अध्यापन प्रक्रिया ही तक्षशिला आणि नालंदाच्या काळापासून गुरु-शिष्य संबंधांचे अधिष्ठान ठेवून विकसित झाली आहे आणि त्यातही जीवनानुभवांच्या आधारे शिक्षणावर भर दिला गेला होता. त्यामुळे आजच्या शिक्षणात अनुभव केंद्रित अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. विद्यापीठांनी आपली पूर्वीच्या रोजगार नोंदणी केंद्रांना 'रोजगार आकांक्षा केंद्रे' या स्वरूपात विकसित करून सक्तीची आणि सशुल्क बेरोजगार नोंदणी सर्वदूर करायला हवी. आपल्या लगतच्या राष्ट्रांच्या भाषांचे शिक्षण देण्याचीही व्यवस्था व्हायला हवी, असेही ते म्हणाले.

कुलगुरू डॉ. महानवर यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर करून विद्यापीठाच्या उपक्रमांची व यशाची माहिती दिली. आजच्या काळाशी सुसंगत वैज्ञानिक, तांत्रिक अभ्यासक्रम सुरू केल्याचे ते म्हणाले. पदवीप्रदान समारंभात ११ हजार ८८१ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे, १६२ स्नातकांना पीएचडी आणि ५७ सुवर्णपदके प्रदान करण्यात येत आहेत. विशेष म्हणजे ४४ विद्यार्थिनींनी सुवर्ण पदक पटकावली आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. यावेळी विद्यापीठाच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात दीक्षांत मिरवणूकीने झाली. कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विद्यापरिषदेचे सदस्य, प्राध्यापक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

तत्पूर्वी विद्यापीठाच्या उद्यम इन्क्यूबेशन सेंटरमार्फत आयोजित स्टार्टअप प्रदर्शनाचे उद्घाटन व पाहणी राज्यपालांनी केली.

## माऊली विद्यालयात गुरुपौर्णिमा कार्यक्रम



**केज/प्रतिनिधी :** निसर्ग माणसांना शिकवतो. सूर्याकडून निस्वार्थता, समुद्राकडून विशालता, नदीकडून अडथळ्यावर मात करून वाहत राहणे, झाडांकडून समता, परोपकारी जीवन जगणे अशी शिकवण मिळते.निसर्गच हाच गुरू आहे.त्याचे संवर्धन केले पाहिजे असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. ते तालुक्यातील जवळबन येथील माऊली विद्यालयात गुरुपौर्णिमा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष बालासाहेब भाकरे, प्रमुख पाहुणे डॉ. हनुमंत सौदागर, मुख्याध्यापक हजारे एस बी. सोळंके एस.डी., देशमुख आर.आर,निकम ए.एम पवार आय. एफ, श्रीमती भाकरे, श्रीमती मस्के आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणालेसंतांची गुरू शिष्य परंपरा आहे.त्यांचे विचार आपण आत्मसात करणे हेच सद्आचरण आहे.महापुरुष हे गुरू आहेत. आई वडील,संत,शिक्षक हे हे ज्ञानरुपी मार्ग दाखवत असतात.विद्यार्थ्यांनी कृतिशील होऊन चांगला माणूस व्हावे.शिस्त जीवनाला ध्येय प्राप्त करून देते. ज्ञानप्राप्तीने जीवन समृद्ध होते.असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सन्मान करून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बी एल ओ विवेक बन्सीधर ढोकर याचे मतदार यादी पुनरनिरीक्षण चे काम शंभर टक्के पूर्ण

**केज/प्रतिनिधी :** नगरपंचायत केज अंतर्गत प्रभाग क्रमांक २९०चे बी एल ओ विवेक बन्सीधर ढोकर यांनी सदरील प्रभागाचे एस.आय. आर. चे काम १०० टक्के पूर्ण करून निवडणुक कामात एक आगळा वेगळा ठसा उमटवला आहे. सदरील काम करताना त्यांनी विविध माध्यमाचा वापर करून जनजागृती निर्माण केली. प्रत्येक मतदाराची वैयक्तिक संपर्क साधण्यासाठी एक व्हाट्सअप ग्रुप तयार करून प्रत्येक मतदाराला या कामासाठी जागृत केले प्रभागाच्या विविध ठिकाणी कॅम्प करून एसआर करण्यासाठी लागणारी कागदपत्रे जमा केली. रात्रंदिवस मेहनत करून हे काम पूर्णत्वास नेले या भागातील सुमारे ७६५ मतदाराचे एस आय आर पूर्ण केले . त्यांच्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदन होत आहे.



## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी १९.३ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात ३० जुलै २०२६ रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी १९.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये उदगीर तालुक्यात सर्वाधिक ३८.३ मिलीमीटर, तर औसा तालुक्यात सर्वात कमी ५.५ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी (मिलीमीटरमध्ये) पुढीलप्रमाणे आहे: लातूर - १४.१, औसा - ५.५, अहमदपूर - २०.१, निलंगा - ८.९, उदगीर - ३८.३, चाकूर - २४.३, रेणापूर - २३.४, देवणी - २८.९, शिरूर अनंतपाळ - २३.१ आणि जळकोट - २५.८ मिलीमीटर.

## लातूरच्या ५ शेतकऱ्यांना मिळणार परदेशात अभ्यास दौऱ्याची संधी; १० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशांमधील विकसित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती व्हावी, तसेच शेतमालाची निर्यात, कृषी मालाचे पणन, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी आणि कृषीमाल प्रक्रिया यांबाबत अद्ययावत ज्ञान अवगत करता यावे यासाठी कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे योजना सन २०२६-२७ राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत परदेशातील शेती तंत्रज्ञान समजून घेऊन त्याचा वापर राज्यातील शेतकरी स्वतःच्या शेतीमध्ये करू शकतील, तसेच संबंधित देशांतील शेतकऱ्यांशी थेट चर्चा, क्षेत्रीय भेटी व विविध कृषी संस्थांना भेटी देऊन शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेसाठी मार्गदर्शक सूचनेनुसार चालू वर्षात युरोप आणि चीन या देशांची निवड करण्यात आली असून लातूर जिल्ह्यासाठी एकूण ५ शेतकऱ्यांचे भौतिक लक्षांक प्राप्त झाले आहे. प्राप्त लक्षांकानुसार १ महिला शेतकरी, १ केंद्र किंवा राज्यस्तरीय विविध कृषी पुरस्कार प्राप्त अथवा पीक स्पर्धा विजेते शेतकरी आणि ३ इतर शेतकरी अशा वर्गवारीतून निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या परदेश अभ्यास दौऱ्यासाठी शासनाकडून एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त २ लाख रुपये (यांपैकी जी रक्कम कमी असेल ती) अनुदान दिले जाणार आहे. या दौऱ्यासाठी पात्र शेतकऱ्यांची निवड जिल्हास्तरीय समितीमार्फत केली जाणार असून, लातूर जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी येत्या १० ऑगस्ट २०२६ पर्यंत आपले अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

# शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी– जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या २ जून २०२६ च्या शासन निर्णयानुसार सुरू करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची यादी यापूर्वीच प्राप्त झाली आहे. या यादीमध्ये नाव असलेल्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही तातडीने करावी. संबंधित बँकांनीही यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क साधून आधार प्रमाणीकरणाबाबत माहिती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील बँक प्रतिनिधींची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व्ही. एल. पोतंगले, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राहुल आठवले यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याची गरज आहे. त्यामुळे सर्व बँकांनी या योजनेसाठी पात्र ठरलेल्या आपल्या कर्ज खातेधारक शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांना नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रात जावून आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याबाबत माहिती द्यावी. आतापर्यंत ३८ टक्के शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून उर्वरित शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही येत्या दोन दिवसात पूर्ण करण्यासाठी सर्व बँकांनी पुढाकार घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी दिल्या.

प्रारंभी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था श्री. पोतंगले यांनी आधार प्रमाणीकरण विषयक कार्यवाहीची माहिती दिली. आतापर्यंत २१ हजार २६८ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही पूर्ण केली असून अद्याप ३३ हजार ३९५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण शिल्लक असल्याचे त्यांनी सांगितले.

## प्रा.डॉ.बालाजी शिंदे यांच्या संशोधनाला भारत सरकारकडून पेटंट



**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील मराठी विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. बालाजी नारायण शिंदे आणि त्यांचे सहकारी संशोधक डॉ.यादव मोरे यांनी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडे भाषा शिकण्याचे उपकरण या विषयावरील उपकरणाचे सादरीकरण केले होते. त्यांच्या या नावीन्यपूर्ण संशोधनासाठी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट मंजूर करण्यात आले व अधिकृत पेटंट प्रमाणपत्र त्यांना प्रदान करण्यात आले आहे. हे त्यांचे कार्य त्यांच्या साहित्यिक प्रतिभेची, संशोधननिष्ठेची आणि मराठी भाषा – संस्कृतीप्रती असलेल्या समर्पणाची गौरवशाली पावती आहे.डॉ.बालाजी शिंदे यांनी केलेल्या या संशोधनामुळे भाषा शिकण्यासाठी सुलभता येणार आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

याप्रसंगी सुप्रसिद्ध सिनेपार्श्वगायक मंगेश बोरगावकर, प्र.प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे, प्रा.डॉ. वसंत बंडे, प्रा. रवि चव्हाण, डॉ. सुदाम पवार, डॉ.मोनालिसा खानोरकर,प्रा. ज्योती मामडगे, प्रा.तुकाराम येमले, डॉ.राम खलंग्रे, प्रा. श्रीमंत दोरवे, प्रा.सलील शहाजिंदे, श्री.शशिकांत सोळुंके, प्रा.अमोल जाधव, श्री. विठ्ठल चव्हाण, श्री.बाळू आडगळे, श्री.कोंडीराम कागले, श्री.बळीराम कदम, सौ.भागीरथी लाड यांनी त्यांच्या या नाविन्यपूर्ण संशोधनाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले आहे.

## श्री केशवराज विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या प्रत्येक वर्गात गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी मंचावर महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे,पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी,अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीमती सुनिता बनसोडे, संस्कार मंडळ प्रमुख श्रीमती रंजना साकोळे, कार्यक्रम प्रमुख श्रीमती जान्हवी देशमुख तसेच पालक प्रतिनिधी बांगड व सौ.सुप्रिया शिंदे यांची मंचावर उपस्थिती होती.

मंचावरील प्रतिमा पूजनानंतर आठवी ते दहावी विभागात वर्गशः गुरुपौर्णिमा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्गशः कार्यक्रमाच्या निमित्ताने कार्यक्रमाची तयारी, वर्गाची सजावट याबाबतीत विद्यार्थ्यांचा उत्साह अवर्णनीय होता. या कार्यक्रमाचे पूर्ण नियोजन प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनीच केले होते.सर्व वर्गांमध्ये त्या त्या वर्गाचे वर्गशिक्षक हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते,तर प्रत्येक वर्गातील एक पालक या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलावण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थी मनोगतातून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदराच्या भावना व्यक्त केल्या. तसेच सर्वच वर्गातील प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांनी गुरुप्रती आदरभाव बाळगावा, गुरुबद्दल नेहमी कृतज्ञतेची भावना मनात बाळगावी असे मत व्यक्त केले. शाळेतील संस्कार मंडळाच्या वतीने हा कार्यक्रम संपन्न झाला.

## एकही पात्र शेतकरी १०० टक्के कर्जमाफीपासून वंचित राहणार नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील एकाही पात्र शेतकऱ्याला कर्जमाफीच्या लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही. कर्जमाफीची दुसरी यादी तयार झाली असून ऑगस्ट महिन्यात १६ लाख ९६ हजार शेतकऱ्यांची नावे प्रसिद्ध केली जातील, अशी घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी केली. तसेच बँकांच्या 'हेअरकट' (आर्थिक तडजोड) मुद्यावरून शेतकऱ्यांनी अजिबात घाबरण्याचे कारण नाही, असे स्पष्ट करत राज्य सरकार आणि बँकांमधील या प्रक्रियेचा शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीवर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पाच जिल्ह्यांतील १६ लाख ९६ हजार शेतकरी खात्यांची दुसरी यादी तयार करण्यात आली असून सर्व माहिती महाआयटी पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. सर्व पात्र शेतकऱ्यांना 'युनिक आयडी' देण्यात आला आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत कर्जमाफीची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाईल, असे कृषिमंत्र्यांनी सांगितले.कर्जमाफीच्या अंमलबजावणीदरम्यान बँकांकडून 'हेअरकट'च्या नावाखाली अडून बसण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या होत्या. यावर स्पष्टीकरण देताना कृषिमंत्र्यांनी सांगितले की, 'हेअरकट' म्हणजे थकीत कर्जाचा किती वाटा राज्य सरकार उचलणार आणि किती हिस्सा बँक सोडून देणार, याबाबतची राज्य सरकार आणि बँकांमधील अंतर्गत आर्थिक तडजोड आहे.

## वर्षावास हा धम्म अभ्यास, आत्मचिंतन आणि समाजप्रबोधनाचे पवित्र पर्व–डॉ. सूर्यवंशी

**अहमदपूर/प्रतिनिधी :** भगवान गौतम बुद्धांनी मानवजातीला दिलेला धम्म हा समता, करुणा आणि प्रज्ञेचा मार्ग आहे. वर्षावासाचा पवित्र कालखंड हा केवळ धार्मिक परंपरा नसून आत्मचिंतन, धम्म अभ्यास आणि समाजप्रबोधनाचा काळ आहे. त्यामुळे प्रत्येक बौद्ध समाजबांधवाने वर्षावासाच्या पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या महान ग्रंथाचे सातत्यपूर्ण वाचन करून बुद्धांच्या विचारांचा आपल्या जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.



बौध्द नगर याथील तथागत बुद्ध विहार येथे वर्षावास प्रारंभ दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भगवान बुद्ध,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्रिशरण व पंचशील ग्रहणाने करण्यात आली.त्यानंतर उपस्थित उपासक- उपासिका बालक बालिका व समाजबांधवांना वर्षावासाचे धार्मिक, सामाजिक व नैतिक महत्त्व सविस्तरपणे सांगण्यात आले.

यावेळी डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले की, वर्षावास हा प्रत्येक बौद्धासाठी धम्माशी अधिक दृढ नाते जोडण्याचा कालखंड आहे. या काळात बुद्धवंदना, त्रिशरण-पंचशील,धम्म प्रवचने,सामूहिक ग्रंथवाचन,ध्यानसाधना आणि समाजोपयोगी उपक्रम यांमध्ये सहभागी होऊन भगवान बुद्धांचा धम्म जनमानसात पोहोचविण्याचे कार्य प्रत्येकाने करण्याचे अवाहन केले.

तसेच, बौद्ध समाजातील प्रत्येक कुटुंबाने वर्षावासाच्या काळात दररोज काही वेळ धम्म अभ्यासासाठी राखून ठेवावा. विशेषतः युवकांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे नियमित वाचन करून बुद्ध, धम्म आणि संघ यांची शिकवण आपल्या आचरणात आणावी, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास बौद्ध नगरातील उपासक-उपासिका, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थित सर्वांनी वर्षावासाच्या संपूर्ण कालावधीत धम्म अभ्यास, प्रबोधन व सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अंजलीताई वाघंबर यांनी केले.तर यावेळेस नवनिर्वाचित नगरसेविका सौ.तनूजाताई सूर्यवंशी यांचा सत्कार समाजाच्या वतीने महिला मंडळांनी केला.

## उद्धव ठाकरे हाजीर हो!

**मुंबई/प्रतिनिधी :** उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना एका जुन्या खटल्याप्रकरणी कल्याण न्यायालयाने समन्स बजावले आहे. कल्याण लोकसभेच्या २००९ मधील निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन उमेदवार दिवंगत वसंत डावखरे यांच्याविरोधात वादग्रस्त व्हिडिओ दाखवून बदनामी केल्याच्या आरोपावरून हे समन्स जारी करण्यात आले असून, येत्या ५ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश ठाकरेंना देण्यात आले आहेत.

कल्याण लोकसभा मतदारसंघात २००९ मध्ये पार पडलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे वसंत डावखरे विरुद्ध शिवसेनेचे आनंद परांजपे अशी मुख्य लढत होती. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान तत्कालीन शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी डोंबिवलीतील सभेत एक व्हिडिओ सार्वजनिकरीत्या दाखवला होता. या व्हिडिओमध्ये (वसंत डावखरे हे कार्यकर्त्यांना निवडणूक जिंकण्यासाठी पोलीस आणि निवडणूक अधिकाऱ्यांची भीती न बाळगता काम करण्याचे आवाहन करताना दाखवण्यात आले होते.

## 'एसआयआर'साठी लातूर शहर विधानसभा मतदारसंघात १ आणि २ ऑगस्ट रोजी विशेष शिबिरांचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम व्यापक, लोकसहभागातून आणि कालबद्ध पद्धतीने राबविण्यात येत आहे. या अभियानाचा अंतिम टप्पा सुरू असून संपूर्ण पुनरीक्षण कार्यक्रमास आता अवघे १० दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. त्या अनुषंगाने शनिवार, ०१ ऑगस्ट २०२६ आणि रविवार, ०२ ऑगस्ट २०२६ रोजी मतदारसंघात सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही दिवशी संबंधित मतदान केंद्रांचे बीएलओ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहून पुनरीक्षणाचे कामकाज पूर्ण करतील आणि उर्वरित वेळेत गृहभेटी देतील.

दिनांक ३० जूनपासून बीएलओ यांच्या घरोघरी भेटी सुरू असून, ज्या मतदारांची भेट होऊ शकलेली नाही किंवा ज्यांनी अद्याप ईएफ फॉर्म भरलेला नाही, अशा सर्व मतदारांनी या विशेष शिबीरांमध्ये सहभागी होवून आपले नाव, पत्ता, छायाचित्र व इतर तपशील पडताळून घ्यावेत. तसेच ज्या मतदारांचे मॅपिंग झालेले नाही, त्यांनी २००२ च्या मतदारयादीतील नाव उपलब्ध असल्यास त्या माहितीसह बीएलओ यांची भेट घ्यावी. शेवटच्या दिवसांत होणारी गर्दी, संभाव्य त्रुटी आणि गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी 'बीएलओ घरी आल्यावरच फॉर्म भरू' असा विचार न करता स्वतः पुढाकार घेऊन मतदान केंद्रावर जावे किंवा संबंधित बीएलओ यांच्याशी संपर्क साधून आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

प्रशासनामार्फत मतदार पुनरीक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी घरभेटी, विशेष शिबिरे, मतदान केंद्रस्तरीय मार्गदर्शन, मदत कक्ष तसेच नागरिकांच्या शंकांचे तत्काळ निरसन करण्यात येत आहे. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून या अभियानात राजकीय पक्षांचे पदाधिकारी, बूथ लेव्हल एजंट (बीएलए), लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

# पत्रकारांनी एकसंघ राहून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका घ्यावी–आ. कराड

**लातूर/प्रतिनिधी :** इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाच्या आजच्या काळात प्रिंट मीडियाने विश्वासहर्ता जपणे गरजेचे असून रेणापूर तालुक्यातील सर्व पत्रकारांनी एकसंघ राहून ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम करून रेणापूर तालुक्याच्या विकासात योगदान द्यावे असे अवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.






महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या रेणापूर तालुका कार्यालयाचे उद्धाटन आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे हे होते तर याप्रसंगी पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अरविंद सावंत, भाजपाचे नेते विक्रमकाका शिंदे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, रेणापूरच्या नगराध्यक्ष शोभाताई आकनगिरे, संगायो समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर, पंस उपसभापती शरद दरेकर, बळीराजा पाणंद शेत रस्ता समिती सदस्य अनिल भिसे, पंस सदस्य तात्याराव वाघमारे, श्रीदेवी गालफाडे, शिवसेनेचे सचिन दाने, राष्ट्रवादीचे बालाजी कदम, नपचे मुख्याधिकारी अजित डोके, पंस अति. गटविकास अधिकारी गोविंद काळे, नायब तहसीलदार यादव, पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर फुले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पत्रकारांनी समाजासमोर वास्तव मांडले पाहिजे. पत्रकाराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला असून कोणीही नाव ठेवणार नाही अशी पत्रकारांकडून कृती घडू नये अशी मौलिक सूचना करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रेणापूर तालुक्याचे आणि माझे अतूट नाते असून या तालुक्यातील सर्व पत्रकारासाठी गृहनिर्माण संस्था सुरू करावी त्यास लागणारी सर्वतोपरी मदत करू अशी ग्वाही देऊन पत्रकारांच्या कामकाजासाठी माझ्याकडून संगणक दिले जाईल असे बोलून दाखवले.

या कार्यक्रमात अशोक देडे, अरविंद सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त करून पत्रकारांच्या भावना व्यक्त केल्या. प्रस्तावित शरद राठोड यांनी केले तर शेवटी विष्णू आचार्य यांनी आभार मानले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी सदस्य तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉर्पींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.